

प.पू. ताईमहाराज चाटुफळे

## ।। माझी रेणुका माऊली ।।

## ।। कल्पवृक्षाची साऊली ।।

// श्री गणेशदत्तगुरूभ्योंनमः //

"प.पु. सौ. ताईमहाराजांच्या कृपारूपी कैवल्याच्या चांदण्यात वेचलेले काही क्षण"

## प.पु. सौ. ताईमहाराजांच्या प्रथम दर्शनाचा योग

पुण्याला गेल्यावर प.पू. महाराजांच्या घरी प्रथम वर्तकवाडा, 551, शनिवार पेठ व त्यानंतर श्री रेणुका निवासात माझा मुक्काम असायचा. 1984 किंवा 1985 साल असावे, श्री रेणुका निवासात मुक्काम असतांना सकाळी उठल्यावर महाराजांना नमस्कार करण्याचा नेम असे. त्यावेळी प.पु. सौ. ताईमहाराजांच्या प्रथम दर्शनाचा योग आला. महाराजांना नमस्कारासाठी गेलो असतांना श्री महाराजांनी सौ. ताई महाराजांचे दर्शन घेतले का? असा प्रश्न विचारला. नाही म्हंटल्यावर त्या भगवती रेणुका स्वरूप आहेत. प्रथम त्यांना नमस्कार करीत जा, असे सांगितले, त्या प्रसंगानंतर प्रथम सौ. ताईमहाराजांना व नंतर श्री महाराजांना नमस्कार असा क्रम सुरु झाला.

## मुलांचे उपनयन संस्कार

जानेवारी 1990 मध्ये चि. अभिजीत व चि. अमित यांच्या मौंजी देऊळगांवराजा येथे करण्याचे ठरले. डिसेंबर 1989 ला प.पू. सौ. ताई महाराजांना निमंत्रण देण्यासाठी गेलो. त्या झोपाळ्यावर बसल्या होत्या. "या, मी तुमचीच वाट बघत होते," असे म्हणून आमचे स्वागत केले. बोलण्याच्या ओघात श्री महाराजांनी तेलंगाकडे मौंजी आहेत, आमचे जाणे होत नसल्याने तुम्ही या प्रसंगी हजर रहावे असे सांगितले. जानेवारीत पुन्हा जालन्याला जाउन प.पू. सौ. ताईमहाराजांना एस.टी. ने देउळगावराजास घेउन आलो. मौंजीबंधनानंतर भिक्षावळ घालण्याचे वेळी पहिली भिक्षावळ घालण्यास ताईंना विनंती केली असताना पहिली भिक्षा घालण्याचा अधिकार आईचा असतो असे त्या म्हणाल्या. यावर आपण त्यांच्या आईच आहात असे म्हंटल्यावर पहिली भिक्षावळ प.पु. सौ. ताईमहाराजांनी घातली. त्यांनी घातलेल्या भिक्षेचे फळ दोघांनाही सदैव मिळत आहे.

1998 साली चि. सौ. रेणुकाच्या विवाहास चि. अभिजीतला घेउन गेलो होतो. सौ. काकुंची तब्येत ठीक नव्हती. प.पू.श्री महाराजांकडे घरी गेलो असतांना तुम्ही मुलाकडचे की मुलीकडचे असा प्रश्न अजितने केला असता, आम्ही मुलीकडचे आहोत असे सांगितले. दुपारी सौ. सुलभाताईंकडे, सौ ताईमहाराजांच्या दर्शनास गेलो असतांना, आता तुम्ही मुलाकडचे आहात असे सौ. ताईमहाराजांनी सांगितले व रोज येथे यावयाचे असे सांगितले.

जानेवारी 1999 मध्ये सौ. आईसाहेबांचे देहावसान झाल्यावर प.पू. श्री महाराजांकडे गेलो होतो. श्री अशोक महाराजांनी दोन दिवस काहीही खाल्ले नव्हते. दुपारी नागपुरला निघतेवेळी सौ. ताईमहाराजांनी पोहे करावयास सांगितले व श्रीपादराव खातील, अशोक महाराज खातील व आम्हीपण खाऊ असे सांगितले व श्री अशोक महाराजांना पोहे खाण्यास भाग पाडले.

सन 2000 मध्ये चि. अभिजीत च्या 2nd Year Engineering च्या प्रवेशासाठी, पुणे येथे गेलो होते. प.पू. सौ. ताईमहाराजही रेणुका निवासात होत्या. अभिजीतने नमस्कार केल्यावर, ॲडमीशन नागपुरातच मिळेल असे सांगितले त्या दिवशी प्रवेश झाला नाही. दुसरे दिवशी सकाळी नमस्काराच्या वेळी अभिजीतने Admission Full झाल्यामुळे नंबर लागला नाही. असे सांगितल्यावर, नागपुरातच प्रवेश मिळेल असे पुन्हा सांगितले प्रवेश केन्द्रात पोचल्यावर सेमिस्टर च्या जागा, रेग्युलर मध्ये convert झाल्याचे नोटीस बोर्डवर लिहीले होते. प्रवेश नागपुरातच मिळाला हे सांगणे नलगे.

त्यावेळी महालक्ष्मीचा सण झाल्यावर अश्विनीला परतवाडयास दाखविण्याकरीता नेणार असल्याचे सांगितले. सौ. ताईमहाराजांनी सांगितले की, आमच्या वहिनींना फुलोरा कमी करण्यास सांगा व महालक्ष्मीच्या आधी परतवाडयास जाण्यास सांगितले व लगेच निर्णय घ्यावयास सांगितले. स्थळ आम्हास पसंत पडले नाही. कारण मुलाची सांपतिक परिस्थिती चांगली असुनही ती गैर मार्गाने मिळवलेली असल्याने आम्ही नकार दिला. व तसे सौ. ताईमहाराजांना कळविले.

त्याआधी आम्ही उभयता जालन्यास गेलो असता, कारंज्याला जाणार असल्याचे सांगितले. जालन्याहून बसने जाण्यास सांगितले. दुपारी 4.30 वाजता कारंजाची एस.टी. होती,5.30 झाले तरी सौ. ताईमहाराजांनी निघू दिले नाही. एस.टी. आता मिळणार नाही म्हणून मनात धाकधुक होती. 6 वाजता सौ. ताईमहाराजांनी जावयास परवानगी दिली. एसटी स्टॉपवर पोचल्यानंतर एसटी लेट असून 6.30 वाजता सुटेल असे समजले. रात्री 1/2 वाजता पोहचलो. बस थांब्यावर एकही प्रवासी नव्हता. अशावेळी एक मुसलमान रिक्षेवाला आला व गुरुमंदीरात जावयाचे आहे का? असे विचारू लागला.

त्याने गुरूमंदीरात सुखरूप पोहचवीले.

सर्व दरवाजे बंद होते. रिक्षावाल्याने व्यवस्थापकांना उठवून आमची धर्मशाळेत सोय करविली. सामान ठेवल्यावर त्याचे आभार मानायला गेलो असतांना, रिक्षेवाल्याचा मागमुसही लागला नाही. ही सौ. ताईमहाराजांची किमया असल्याचे लक्षात आले व मन भारावले.

चि. अश्विनीसाठी स्थळ कुठले असेल, असे विचारल्यावर नागपुरातच नात्यातील मुलगा आहे असे सांगितले व पत्रिका पाहुनच लग्न करावे असे सांगितले. त्याप्रमाणे योग जुळून आला.

त्या आधीचा एक प्रसंग सौभाग्यवतीला स्वप्नात सौ. ताईंनी मंगळसुत्र दिले. जालन्यात गेल्यावर खरोखरच सौ. ताईमहाराजांनी हिच्या हातात सोन्याचे मंगळसुत्र दिले. याचे काय करायचे असे विचारल्यावर हे मंगळसुत्र अश्विनीला माहेरचे मंगळसुत्र म्हणून द्यावे असे सांगितले. अश्विनीचे साक्षगंध झाल्यावर सौ. ताईमहाराजांना जालन्यात सविस्तर वृतांत सांगितला व फोटोचा अल्बम विसरल्याचे सांगितले. त्या हसल्या व साक्षगंधाच्या प्रसंगाचे सविस्तर वर्णन आम्हास सांगितले.

अश्विनीच्या लग्नाचा कुळाचार रविवारी करण्याचे ठरले. गुरूवारी माझी प्रकृति अचानक बिघडली. शनिवारी सौ.ताई महाराजांना अश्विनीने फोन केला असता, बाबांना फोन दे असे सांगितले व मला म्हणाल्या. "श्रीपादराव, दत्ताला अक्षत दिली होती काय?" मी पत्रीका व अक्षता दिल्याचे सांगितल्यावर त्या म्हणाल्या. "श्रीपादराव हे सामान्य माणसाचे काम झाले. उद्या सकाळी दत्ताला जाऊन या. अभिषेक, हार पेढे व पुन्हा अक्षता ठेवूनच या व घरी येऊन कुळाचाराला सुरवात करा" असे त्यांनी सांगितले. कुळाचार सुखरूपपणे पार पडला. जालन्यास गेल्यावर सौभाग्यवतीने तुम्ही आला नाहीत असे म्हंटल्यावर, मी आले होते ना, मोकळी डाळ किती खारट झाली होती हेही सांगितले. खरोखरीच सवाष्णीने पहिल्याच घासाला डाळ खूप खारट झाल्याचे सांगितले होते.

अश्विनीच्या लग्नाचे केळवण कार्तिकी पोर्णिमेला सौ. ताई महाराजांच्या घरी झाले. तेव्हा त्यांनी तेलंगांच्या घरी पोर्णिमेचा कुळाचार असल्यामुळे पुरणा, वरणाचा स्वयंपाक, करावयास सांगितले. चि. अश्विनीला ताईमहारांनी 1 तास आपल्या खोलीत बसुन काही सुचना केल्या त्याचा तपशील आम्हाला अजुनही कळलेला नाही. मी वळलेल्या खिरी चालतील का असे अश्विनीच्या आईला विचारले व स्वत: वळलेल्या पाच प्रकारच्याखिरी दिल्या; अश्विनीचे लग्न ठरल्यावर 40 ग्रॅमच्या बांगडया

करणार असल्याचे सांगितल्यावर, श्रीपादराव 40 ग्रॅमच्या बांगडया कुठे होतात का? 60 ग्रॅमच्या बांगड्या करा, असे सांगितले व 20 ग्राम माझ्यातर्फे बरं का ! असे त्या म्हणाल्या.

अश्विनीचे लग्न झाल्यावर 1 महीना पुरेल एवढा शिधा, चहा साखरेपासून या. तुम्ही देता की मी देऊ अशीही विचारणा केली. लग्न होऊन मुरादनगरला (दिल्ली) गेल्यावर महीन्यातून एकदा फोन करण्याबद्दल अश्विनीला सुचना दिली.

एकदा बोलण्याच्या ओघात त्यांनी अश्विनीला खालीलप्रमाणे सांगितले तुझ्या आजी आजोबांचा प्रपंच श्री ढुंढीराजमहाराजांनी केला. तुझ्या आई-बाबांचा प्रपंच श्री दत्तमहाराजांनी केला. तसाच तुझाही प्रपंच महाराज करतील.

आमचे जावई श्री चेतन रात्रपाळीला गेल्यावर अश्विनी घरी एकटी असायची. नवीन प्रदेश गुंडगिरीचे प्रमाण जास्त. सौ. ताई महाराजांना तिने फोन करून सांगितल्यावर, अग महाराज तुझ्या बरोबर असतात असे सांगितले. तेव्हापासुन तिला रोज रात्री महाराजांच्या पावलांचा आवाज यायचा व तिची भिती कुळल्याकुठे पळून गेली. तसेच साप वगैरे खूप निघायचे, यावर श्री अशोक महाराजांनी सायंदेवाच्या रक्षणासाठी सापांची योजना श्री गुरूंनी केली होती तशी महाराजांनी तुझ्यासाठी केलेली आहे असे सांगितले.

एकदा अश्विनीची प्रकृती तीन दिवस बरी नव्हती ती स्वयंपाक करून परत झोपत असे. महीन्याचा फोन गेल्यावर सौ. ताई महाराजांनी माझ्या मुलासाठी खारट स्वयंपाक करतेस का म्हणून कानउघडणी केली. खरोखर तीनही दिवस स्वयंपाक खारट झाल्याचे श्री चेतनकडून समजले.

2000 साली बँकेत स्वेच्छा निवृत्तीची योजना जाहीर झाली. मी संपूर्ण हिशोब करून कागद ताई महाराजांसमोर ठेवला. त्यांनी कागद बाजुला केला व म्हणाल्या, श्रीपादराव मी भाजी भाकरी करणारी बाई आहे, मला यातले काही कळत नाही. पण आपल्याला श्री दत्त महाराजांच्या कृपेने नोकरी मिळाली आहे. ती मधेच सोडू नये. ऐवढेच मला कळते. मी कागद फाडून फेकला हे सांगावयास नकोच. आता उरलेल्या नोकरीची जवाबदारी ताई महाराजांनी घेतली असल्याचे मी कुटुंबात जाहीर करून टाकले. मी नागपूर मुख्य शाखेत असतांना दोन दिवसाकरिता Government Businesss Department चा Incharge होतो. संपूर्ण भारतातील आयकर, विक्रीकर संबंधित बँका जमा करून बँक ऑफ इंडिया च्या नागपूर मुख्य शाखेत

पाठवितात व दुस-या दिवशी Reserve Bank of India च्या नागपुर शाखेत आम्हाला जमा करावा लागतो. 66 लाखाचे दिल्लीवरून आलेल्या कराचे voucher माझ्या हाताखालील अधिका-यांकडून नजर चुकीने न झाल्यामुळे तेवढ्या रकमेचा भरणा रिझर्व बँकेत जमा झाला नाही.

एक महिन्यानंतर ही गोष्ट लक्षात आली. संबंधित विभागाचा In charge म्हणून, माझी चूक नसतांनाही अधिकारी या नात्याने अप्रत्यक्षरित्या माझ्यावर जवाबदारीहोती. सुमारे 31 लाखाची पेनॉल्टी आमचे शाखेवर बसली. श्री दत्त महाराज व प.पू.सौ. ताईमहाराजांच्या कृपेने या प्रकाराबद्दल मला कोणीही जवाबदार धरले नाही व एकाही शब्दाने विचारले नाही. सदगुरुवर पूर्ण विश्वास ठेवल्यास आपल्यावर आलेल्या संकटाचे निवारण सदगुरूकडुन कसे होते याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

मुलगी व जावयास नेहमी काही तरी देत जावे. त्यांच्याकडून काही घेतल्यास पाप लागते, असे सौ. ताई महाराजांकडून सांगणे झाले.

जालन्याच्या कार्यक्रमाच्या पत्रिका आम्ही छापत नाही, पण तुमच्या पर्यंत हवा येत जाईल असेही एकदा सांगणे झाले.

एकदा जालन्यास तीन दिवसांकरिता गेलो होतो. जातांना देऊळगावराजाला थांबून मग जालन्याला गेलो. बरोबर एक सदगृहस्थही होते. प.पू. ताई महाराजांना हे आवडले नाही. दोन दिवस त्या माझ्याशी बोलल्याही नाहीत. प्रथमच असे झाले. पहील्या दिवशी श्रीमाधवराव व दुस-या दिवशी सौ. सुलभाताई यांचे जवळ श्रीपादराव देऊळगावराजावरून आले व बरोबर पित्तुही होऊन आले असाउल्लेख केला. तिसरे दिवशी माझ्याबरोबर बोलणे झाले. तेंव्हा तुमच्या बरोबर कोणी असले की, आम्हाला तुमाच्याबरोबर मोकळे बोलता येत नाही असे त्यांनी सांगितले.

अभिजितसाठी पुण्यात मुलगी बघण्याचा कार्यक्रम झाला. प.पू. सौ ताईमहाराज श्री अजीतकडे होत्या म्हणून दर्शनाला गेलो असतांना नागपूरची मुलगी करा असेही त्यांनी सांगितले. अमितच्या लग्नाच्या वेळेसही नागपूरची मुलगी करा असे सांगितले.

अश्विनी दिल्लीवरून जालन्याला येतांना कुठल्या गाडीने यायचे व जायचे याचे मार्गदर्शन केले. दिल्लीला जातांना 15 दिवस पुरतील एवढे पदार्थ बरोबर दिले.

अश्विनी गरोदर असतांना मला घोरातकष्टातचे निरंतर पाठ करावयास सांगितले. श्री चेतनला दिल्लीची सरकारी नोकरी सोडून पुण्यास स्थायिक होण्यास सांगितले व नोकरीची व्यवस्थाही त्यांच्याच कृपेने झाली. उत्तरेच्या गर्भाचे संरक्षण श्री कृष्णाने केल्याचे वर्णन श्री भागवतात आहे. सौ. अश्विनीच्या गर्भाचे रक्षणही सौ. ताई महाराजांनी केले. याचाही अनुभव आम्ही घेतला आहे.

आमचे 2 नातु व नात यांची नावें ही सौ. ताई महाराजांनी सुचवल्याप्रमाणेच आम्ही ठेवली. नगर वरून आमच्या नातीचे लग्न आटोपून आम्ही जालन्याला आलो. तेथून नातवाच्या लग्नाच्या कुळाचारासाठी देऊळगावराजास जायचे होते. तेंव्हा येथे देव नाहीत का असे विचारले व येथुनच जालन्याला लग्न आहे तेथेच सरळ जावे असे सांगितले. बारशाच्या वेळी अश्विनीला मोहन माळ करा व तिही पुण्यातच असा आदेश दिला. अभिजीतला नागपुरला नोकरी लागली व अमितला ही पुण्यात त्याचवेळेस लागली. दोघांनीही पहीला पगार सौ. ताई महाराजांसमोर ठेवला. तेंव्हा आईजवळ द्या असे सांगितले. आपण मातृस्वरूपीच आहात, आपण स्पर्षतरी करा अशी विनंती केल्यावर हस्तस्पर्श करून पैसे परत केले.

अभिजीतला बाहेरगावी चांगल्या नोकरीच्या अनेक संधी आल्या. पण सौ. ताई महाराजांनी नागपुर सोडायचे नाही असे सांगितले, असल्याने त्याने त्या नाकारल्या. एकदा बेंगलोरला एचसीएल मध्ये नोकरीसाठी बोलावणे आले असतांना मी जालन्याला जाऊन सौ. ताईमहारजांना विचारतो म्हणून तो गेला. सौ. ताईमहारज नाही म्हणतील याची मनाची तयारी करूनच तो गेला होता. दुपारी 12 वाजता त्याचा फोन आला. त्यांचे दर्शन झाले नाही असे तो म्हणाला. 12.05 मीनिटांनी सौ. ताईमहारजांचे दर्शन झाले व त्यांनी परवानगी दिली असा त्याचा पुन्हा फोन आला. बैंगलोरवरून पुण्याला दुसरी कंपनी join केली. सौ. ताईमहारजांच्या कृपेने अनेकवेळा अमेरिकेत जाण्याची संधीही मिळाली 2009 मध्ये त्याला अमेरिकेत नवीन Project वर जाण्याची संधी आली तेंव्हा त्याने सौ. ताईमहाराजांना 1 वर्षासाठी जावे लागेल. मोठे प्रोजक्ट आहे तेंव्हा भिती वाटते असे म्हटल्यावर मी तुझ्या बरोबर आहे. आणि तु 3.4 वर्षे येणार नाहीस असे सांगितले.

मोठी सुन सौ. अनुजास श्री शिवलिलामृत व लहान सुन सौ. वैशालीस श्री गजानन विजयाचे पारायण करण्यास सांगितले.

आपण लेक, जावयास काही दिले तर, आपल्याला अनेक पटीने मिळते असेही त्यांनी सांगितले. श्री महाराजांच्या सहवासातील आठवणी लिहा असे अनेक गुरूबंधुचे म्हणणे सौ. ताईमहारजांना सांगितल्यावर त्यांनी परवानगी दिली व तीन दिवसांत आठवणी लिहून झाल्या.

अमितला नागपुरात दोघांसाठी Flat घ्या व Flat कसे असावेत हेही सांगितले. राहत्या घरापासून हाकेच्या अंतरावर घ्या असेही सांगितले. आठ दिवसांत घरापासून हाकेच्या अंतरावर 2 Flat मिळाले.

सौभाग्यवतींच्या मनाप्रमाणे घरात सुधारणा करा असे सांगून त्या निमित्याने घरात अनेक सुधारणा करवून घेतल्या.

अमेरिकेत जाण्याची अनुमती दोनदा नाकारली तिस-या वेळेस श्री महाराजांचा जन्मोत्सव करून जा व सगळं पाहून चार्तुमास सुरू व्हायच्या आधी या असे सांगितले. विनायासास व्हिसा मिळून जाण्यायेण्याचा प्रवास सुरळीत झाला. प्रवासांत सौ ताई महाराज आमच्या बरोबर असल्याचे सतत जाणवत होते.

जून 2013 मध्ये दुपारी जागृत अवस्थेत अमेरीकेत सौ. ताई महाराजांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. श्रीपादराव गुरूचरीत्र वाचन सुरू आहे ना? असे विचारले हो म्हटल्यावर चालु द्या आम्ही ऐकायला येत असतो असे सांगितले व अदृश्य झाल्या.

कारंजा येथे श्री अशोक महाराज व सौ. ताई महाराजां बरोबर श्री च्या दर्शनाचा लाभ झाला.

3 नोव्हेंबर 2012 ला दुपारी 12 ते 1 च्या सुमारास अनुजाची प्रकृति ठीक नसल्याचा अभिजीतचा फोन आला अमेरीकेत रात्री 2-2½ चा सुमार असावा. वेबकॅमेरावर पाहीले असतांना तिला बघितल्या-वर आम्हीही अस्वस्थ झालो. सौ. अर्चनाला जालना येथे फोन करून प.पू. सौ. ताईमहारजांच्या कानावर ही बातमी घालावयास सांगितली. सौ अर्चनाचा फोन आला व ताईमाहराज बरं म्हणाल्याचे तिने सांगितले.

तिने फोन ठेवल्याबरोबर अभिजीतचा फोन आला व अनुजाला जोराची उलटी होऊन बरे वाटत असल्याचे त्यांने सांगितले.

पादुकांना प्रदक्षिणा घालतांना महाराजांचे सोवळे प्रसाद म्हणून मिळावे अशी इच्छा झाली. दुस-याच क्षणाला सौ. ताई महाराजांचा निरोप आला व त्यांनी पादुकांवरचे सोवळे प्रसाद म्हणून दिले.

जालन्याला न्यावयाची Airbag खराब झाली असल्याने नागपुरला आल्यावर नवीन घेऊ असे आमचे उभयतांचे बोलणे झाले. जालन्यात गेल्यावर सौ. ताईमहाराजांचा निरोप आल्यावर दर्शनास गेलो असता नवीन Airbag प्रसाद म्हणून मिळाली.

चि. अमित यांस चांगल्या Packages च्या नोक-या करण्याची परवानगी दिली नाही. श्री महाराजांनी तुम्हाला आमच्यावर सोपवले आहे. आम्हाला विचारल्या शिवाय कोणतेही महत्वाचे निर्णय घेऊ नका. कोण काय म्हणेल याचा विचार करु नये, अशा आम्हाला सौ. ताईमहाराजांच्या सुचना आहेत. त्यांनी घेतलेला कोणताही निर्णय आमच्या हिताचाच असणार असा आम्हा सर्वांचाच दृढविश्वास आहे.

प.पू. सौ. ताईमहाराजांना परमेश्वराने दिर्घायुरारोग्य द्यावे हीच जगनियंत्याच्या चरणी सर्व भक्त मंडळी तर्फे प्रार्थना ।

।। श्री गुरूदेव दत्त ।।

श्रीपाद तेलंग, नागपुर
9860979895